# ग्लोबल इंटीग्रीटी रिपोर्ट- २०११

**९ एप्रिल २०१२**

तन्मय कानिटकर

GreenEarth

GreenEarth Social Development Consulting Pvt. Ltd.
contactus.greenearth@gmail.com

(शासन व्यवस्थेच्या नीलप्रतीसाठी)

# ग्लोबल इंटीग्रीटी रिपोर्ट- २०११

'ग्लोबल इंटिग्रिटी रिपोर्ट' हा अमेरिकेतील क्रिएटिव्ह कॉमन्स ही संस्था दर वर्षी करते. वेगवेगळ्या देशांतील सरकारमधील आणि सरकारी यंत्रणांमधील लोकांची सचोटी, इमानदारी आणि कामावरची निष्ठा अशा गोष्टींचा अंदाज येण्याच्या दृष्टीने ही संस्था काही निकष ठरवून अहवाल तयार करते. २०१२ सालचा अहवाल ३१ देशांचा अभ्यास करून बनवलेला आहे.

## राजकीय पक्षांचे अर्थकारण- पारदर्शकता

हा अहवाल बनवताना सुमारे ३०० वेगवेगळ्या गोष्टी विचारात घेतल्या आहेत. ज्या आधारे एखाद्या देशाच्या कारभारातील सचोटीचा अंदाज येईल. यामध्ये वृत्तपत्रीय किंवा माध्यमांचे स्वातंत्र्य, न्याययंत्रणेचे स्वातंत्र्य आणि क्षमता, भ्रष्टाचारासारखी प्रकरणे बाहेर काढणाऱ्यांना संरक्षण असं विविध मुद्द्यांचा समावेश होतो.

या अहवालातील एक वैशिष्ट्यपूर्ण निरीक्षण म्हणजे राजकीय पक्ष व उमेदवार आणि त्यांचे अर्थकारण यात असलेल्या पारदर्शकतेचा अभ्यास. एखाद्या देशाच्या राज्यकारभारातील गैरकारभार आणि भ्रष्टाचाराचा संबंध राजकीय पक्षांच्या अर्थकारणाशी असू शकतो हे विचारात घेऊन सुमारे ३० मुद्द्यांच्या आधारे या अहवालात अभ्यास केला आहे.

**इतर देश**

राजकीय पक्षांचे अर्थकारण या विषयाबाबत साधारण सर्वच देशांमध्ये अत्यल्प कायदे, असलेल्या कायद्यांची अंमलबजावणी नाही असे निरीक्षण हा अहवाल नोंदवतो. या अहवालात १०० पैकी गुण देताना ३१ पैकी तब्बल २९ देशांचे गुण ६० पेक्षा कमी आहेत. भारताला तर याबाबत अवघे २८ गुण आहेत.

राजकीय पक्षांचे अर्थव्यवहार या दृष्टीने अमेरिका, जर्मनी, आयर्लंड, कोलंबिया हे देश अत्यंत पारदर्शक आहेत. विशेषतः कोलंबियाचा (८५ गुण!) आवर्जून उल्लेख केला पाहिजे. कोलंबिया हा भारतासारखाच विकसनशील देश आहे. पण त्यांच्याकडे राजकीय पक्षांच्या

अर्थव्यवहाराबाबत काही ठोस कायदे केलेले आहेत ज्याची अंमलबजावणी करण्यातही ते यशस्वी झाले आहेत.

याउलट ज्या चीनशी आपली सातत्याने तुलना केली जाते तिथे राजकीय अर्थव्यवहारातील पारदर्शकता औषधालाही नाही. चीनला या विषयामध्ये अवघे ४ गुण मिळाले आहेत.

**भारताबाबत-**

राजकीय पक्षांचे अर्थकारण या विशिष्ट विषयामध्ये भारतात मुळात कायद्यांची कमतरता आहे. कायदे असण्याच्या बाबतीत भारताला या रिपोर्ट मध्ये अवघे ४ गुण मिळाले आहेत. आणि जिथे कायदे आहेत तिथे त्यांची अंमलबजावणी योग्य पद्धतीने झालेली नाही असा निष्कर्ष या रिपोर्ट मध्ये काढण्यात आलेला आहे.

भारतातील राजकीय पक्षांचे अर्थव्यवहार याबाबत नोंदवलेली काही निरीक्षणे-

- एखाद्या राजकीय पक्षाला किंवा उमेदवाराला किती आर्थिक मदत करावी याबाबत स्वतंत्र व्यक्तींवर कोणतेही बंधन नाही.
- एखाद्या कंपनीने राजकीय पक्षाला द्यावयाच्या आर्थिक मदतीबाबत कायद्याने काही बंधने घालण्यात आलेली असली तरीही याबाबत कुठेच पारदर्शकता नाही असे हा रिपोर्ट नोंदवतो.
- देणगी देणाऱ्यांची नावे प्रसिद्ध करण्याचे कायद्याने बंधन राजकीय पक्षांवर नाही.
- राजकीय पक्षांच्या अर्थव्यवहारांचे लेखापरीक्षण करण्याची, अथवा अर्थव्यवहारांवर नजर ठेवण्याची कोणतीही स्वतंत्र यंत्रणा भारतात अस्तित्वात नाही.
- निवडणुकांच्या वेळी प्रचारादरम्यान राजकीय पक्षांनी करावयाच्या खर्चावर बंधन नाही. तसेच नेमकं किती खर्च होतो आहे हे बघण्याची, मोजदाद करण्याची कोणतीही यंत्रणा नाही.
- निवडणुकांच्या वेळी उमेदवारांवर प्रचारादरम्यान खर्च करण्यावर कायद्याने बंधन असते. मात्र या बाबतच्या नियमांचे उल्लंघन केल्यावर शिक्षा होण्याचे प्रमाण भारतात अत्यल्प आहे.

- दर वर्षी राजकीय पक्षांना आपल्या अर्थव्यवहाराबाबतचा अहवाल निवडणूक आयोगाकडे सादर करायला हवा असे कायद्यात म्हणले असले तरी याची अंमलबजावणी होत नाही असेच दिसून आले आहे. शिवाय निवडणूक आयोगाच्या वेबसाईट वर हा अहवाल प्रसिद्ध करावा असे असले तरी प्रत्यक्षात ते नसल्याचेच आपल्याला दिसून येते.
- निवडणुकीच्या वेळी प्रचारादरम्यान उमेदवाराने केलेल्या खर्चाचे तपशील नागरिकांना बघण्यासाठी खुले असतात.
- मात्र नागरिकांना बघण्यासाठी असलेल्या कोणत्याही दस्तऐवजाचा दर्जा मुळीच चांगला नसतो असे हा रिपोर्ट नमूद करतो. माहिती अधिकार कायद्यामुळे काही प्रमाणात पारदर्शकता आली असली तरी एकूण माहितीचा दर्जा चांगला नसणे ही गोष्ट महत्वाची आहे.
- निवडणुकांच्या वेळी उमेदवारांना आपल्या मालमत्तेचा तपशील जाहीर करावा लागतो. याबाबतीत कायद्याची अंमलबजावणी अगदी तंतोतंत होते.
- एकूण म्हणजे राजकीय पक्ष आणि उमेदवार यांना मिळणाऱ्या पैशाचा कोणताही हिशोब किंवा लेखाजोखा नसतो. पैसे कोठून आले आणि कोठे खर्च झाले याबाबत कुठलीही पारदर्शकता नसणे हा प्रश्न मोठा आहे.

भारतात सामाजिक संस्था, कंपन्या, सरकार या सर्वांच्या अर्थव्यवहारावर लक्ष ठेवणाऱ्या यंत्रणा कायद्याने अस्तित्वात आहेत इतकेच नव्हे तर त्याची अंमलबजावणीही होत असते. केवळ राजकीय पक्षांच्या अर्थव्यवहाराबाबत पारदर्शकता आणण्यासाठी कोणताही स्पष्ट, ठोस कायदा नसणे हे नक्कीच आक्षेपार्ह आहे.